R.No. S-T/KRD/BNK/(O) - 113/16.03.95

# आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब सहकारी बँक लि.,कराड

मुख्य कार्यालय-१५/३ क, मंगळवार पेठ, टिळक रोड, कराड पिन- ४१५ ११०

## सत्तावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

आदरणीय पी.डी.पाटीलसाहेब सहकारी बँक लि., कराड या बँकेच्या सभासदांची सत्तावीसावी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि.२४ सप्टेंबर २०२२ रोजी दुपारी २ वाजता सौ.वेणूताई चव्हाण स्मारक ट्रस्ट, कराड येथे बँकेचे चेअरमन श्री.अशोक पांडुरंग पाटील यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. तरी सदर सभेस आपण अगत्याने उपस्थित रहावे, ही विनंती.

### -सभेपुढील विषय-

१) मागील दि. २८ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२१-२२ सालचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.

३) मा.संचालक मंडळाने मंजुर केलेल्या सन २०२२-२३ चे अंदाजपत्रकास मंजुरी देणे व सन २०२१-२२ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

४) शासकीय लेखापरिक्षकाकडून आलेल्या सन २०२१-२२ सालचे हिशोब तपासणी अहवालाची व त्याच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

५) दि. ३१ मार्च २०२२ अखेरचे नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे.

६) मा.संचालक मंडळाने सन २०२२-२३ करिता शिफारस केलेल्या व रिझर्व्ह बँकेने मंजुरी दिलेल्या वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास मंजुरी देणे.

७) मा.संचालक मंडळाने सन २०२२-२३ करिता नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांच्या मेहनतानास मंजुरी देणे.

८) सत्तावीसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.

९) मा.संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१०) बँकेची पुढील पाच वर्षाची ध्येय धोरणे व कृती आराखडा अवलोकनी घेऊन त्यास मान्यता देणे.

११) मा.अध्यक्षांचे परवानगीने आयत्या वेळी आलेल्या विषयांचा विचार करणे.

स्थळ-कराड<br>
दिनांक -०२ सप्टेंबर २०२२

मा.संचालक मंडळाचे आदेशावरून<br>
**एन.जी.मोमीन**<br>
मुख्य कार्यकारी अधिकारी

---

### - विशेष सुचना -

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झालेस सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सुरू होईल. त्या सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

२) कामकाजाच्या संदर्भात काही माहिती अगर तपशील पाहिजे असल्यास सभासदांनी बँकेच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.

३) बँकेचा दि. ३१ मार्च २०२२ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटापत्रक सर्व सभासदाना पोस्टाने पाठविला आहे.

४) दि. ३१ मार्च २०२२ अखेर बँकेचा ताळेबंद, नफा तोटापत्रक, कॅश फ्लो स्टेटमेंट, वैधानिक लेखापरिक्षण रिपोर्ट इ.वार्षिक अहवालाची संपुर्ण माहीती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिध्द केली आहे. तसेच बँकेची वेबसाईट www.pdpbank.com वर प्रसिध्द केली आहे.

५) बँकेचे दि.२८ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेल्या गत वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त बँकेची वेब साईट www.pdpbank.com वर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिध्द केली आहे.